PUNE RESEARCH TIMES (ISSN 2456-0960)
AN INTERNATIONAL JOURNAL OF CONTEMPORARY STUDIES SPECIAL ISSUE OCT 2018

# तेराव्या शतकातील आध्यात्मिक लोकशाही

**प्रा. डॉ. विजय पाटील**
मराठी विभाग
सिध्दार्थ महाविध्यालय, जाफ्राबाद
जि. जालना **महाराष्ट्र भारत**

## प्रस्तावना :

मराठी वाङ्मयाचे प्रामुख्याने तीन कालखंड पडतात त्यात प्राचीन किंवा मध्ययुगीन कालखंड, आधुनिक कालखंड व आर्वाचीन कालखंड, प्राचीन किंवा मध्ययुगीन कालखंडात मराठी भाषेत निर्माण झालेले लिखित साहित्य त्यात शिलालेख, ताम्रपट, हस्तलिखित पोथ्या, ग्रंथ ते संत, पंत, तंत, विविध संप्रदाय इत्यादींचा समावेश होतो याच कालखंडात तेराव्या शतकात वारकरी संप्रदायाने जी आध्यत्मिक लोकशाही निर्माण झाली त्या संतांच्या वाङ्मयाचा शोध या शोधनिंबंधात घेण्यात आला आहे.

### ❖ आध्यत्मिक लोकशाही म्हणजे काय?

भारतीय लोकशाहीची आपण केलेली व्याख्या पुढीलप्रमाणे लोकांनी लोकांच्या कल्याणासाठी वापरलेली शासन व्यवस्था म्हणजे लोकशाही होय. अशी साधारणतः आपण व्याख्या करतो. परंतु येथे अभिप्रेत आहे आध्यात्मिक लोकशाही. काळ आणि जडविश्व यांच्या पलीकडे या विश्वात असलेल्या आत्मतत्वाचा अभ्यास करणारे शास्त्र. या विश्वात हे दृष्य विश्व पंच महाभूतांचे आहे. पृथ्वी, अप, तेज, वायू व आकाश यापंचभौतिक प्रकृतीत तीन गुण सत्व, रज व तम यांची मिळून अष्टधाप्रकृती निर्माण झाली व ती ब्रम्हरूपात विलसली. प्रत्येक प्राणी मात्रांचे शरीर हे या अष्टप्रधानकृतीने बनलेले आहे. त्याच अष्टप्रधानप्रकृतीचा विस्तार केला तर अनेक तत्वे निर्माण झालेली दिसतील हा झाला जडवस्तु. जी डोळयांना दिसते तीचा अभ्यास व जे अनंतब्रम्हांडी जो परमात्मा अनेक वर्ष तपश्चर्या करूनही समजत नाही जो अदृष्य आहे पण त्याच्याच सत्तेने हे जग चालते तो ब्रम्हांडनायक परमात्मा ईश्वर भगवान चराचरात भरला आहे. जो प्रत्येक प्राणीमात्राच्या ह्दयात विराजमान आहे. त्याचा अभ्यास म्हणजे अध्यात्म होय.

## ❖ तेराव्या भातकातील आध्यात्मिक लोकशाही:

महाराष्ट्र ही संताची भूमी आहे संत साहित्याने मराठी जनमानसाचे भरणपोषण केले आहे. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक इतिहासाच्या जडणघडणीत मराठी संताचा आणि त्यांच्या वाड्मयीत कार्याचा फार मोठा वाटा आहे. या सर्वात संत ज्ञानदेवाचे स्थान असाधारण आहे.

संत कृपा झाली । इमारत फळा आली ।।1 ।।
ज्ञानदेव रचिला पाया । उभारिले देवालया ।।2।।
नमा तयाचा किंकर । तेणे रचिले ते आवार ।।3।।
जनार्दन एकनाथ । खांब दिधला भागवत ।।4।।
तुका झालासे कळस। भजन करा सावकाश।।5।।
बहिणी म्हणे फडकती ध्यजा निरूपणी केले वोजा ।।6।।

ज्ञानेश्वरांनी केवळ बहिणाबाईच्या अंभगानुसार वारकरी संप्रदायाचा पाया रचला नाही तर मराठी वाड्मयाचाही पाया रचला. त्यांनी येथील मानसांच्या मनाची मशागत केलीण तेराव्या शतकात यावनी सत्तेच्या अंमल सुरू होता सर्व जनता भयभीत झाली होती. 12 व्या शतकाच्या उत्तरार्धात उत्तरेतून अलाउद्दीन खिलजीचे अरिष्ट महाराष्ट्रावर आले. एकछत्री यादवांची सत्ता जावून त्यांना मांडलिकत्व स्वीकारावे लागेल. त्यामुळे समाजात विषमता निर्माण होती. समाजातील बारा –बलुतेदार व अठरा आलुतेदार इतरत्र विखुरलेले होते. धार्मिक क्षेत्रात व्रतवैकलय, कर्मकांड व जप–तप यांचे प्राबल्य होते, राजकीय क्षेत्रात अराजकता होती अशा काळात संत ज्ञानेश्वरांनी अशा विखुरलेल्या समाजात स्वातंत्र्य, समता व बंधुता निर्माण करून आध्यात्माच्या माध्यमातून मानवाला भक्तिची दारे खुली करून दिलीत.

संत नामदेव पूर्वकाळापासून वारकरी संप्रदाय चालू आहे. या संप्रदायाला ज्ञानेश्वर माउलींनी ज्ञानेश्वरीच्या रूपाने एक अधिष्ठान दिले. संप्रदायाला निश्चित स्वरूप दिले. याच काळात ज्ञानेश्वरांकडून प्रेरणा घेवून अठरा पगड जातीचे लोक आपआपल्या परीने आध्यात्माचा साक्षात्कार झाला होता. त्यात संत गोरोबा काका, सावता महाराज, चौखा मेळा, नरहरी महाराज, जनाबाई मुक्ताबाई, निवृत्तीनाथ, सोपन काका, सोयराबाई, विसोबा खेचर परिसा भागवत इ. संत मंडळीचा सहभाग होता.

## ❖ संत नामदेव :–

इ.स.1270 ते 1350 हे महराष्ट्रातील वारकरी संत होते. त्यांचे आडनाव रेळकर संत नामदेव हे मराठी भाषेतील पहिले चरित्रकार व आत्मचरित्रकार आणि कीर्तनाच्या माध्यमातून भागवत धर्म पंजाबपर्यंत नेणारे आद्य. प्रचारक होते त्यांनी ज्ञानेश्वरांच्या संजीवन समाधीनंतर सुमारे 50 वर्ष भागवत धर्माचा प्रचार केला. प्रतिकूल परिस्थितीमध्ये महाराष्ट्राची भावनिक एकात्मता जपण्याचे अवघड काम त्यांनी केले. पंजाबमधील शीख बांधवाना ते आपले वाटतात.

नाचु किर्तनाचे रंगी, ज्ञानदीप लावू जगी

या प्रेरणेतून भागवत धर्माची पताका महाराष्ट्राबाहेर म्हणजे, पंजाबपर्यंत फडकविली त्यांनी एक कोटी अंभग लिहिले असे मानले जाते. याचा अर्थ त्यांनी विपूल संख्येने साहित्यरचना केली असा अर्थ घ्यायाला काही हरकत नाही त्यांनी संत ज्ञानेश्वरासंबंधी जे अनुभव आलेत ते आदि, तीर्थावळी व समाधी या ग्रंथाच्या माध्यमातून अभिव्यक्त केले आहेत.

### ❖ संत ज्ञानेश्वर : इ.स. 1275 ते 1296

हे 13 व्या शतकातील प्रसिध्द मराठी संत आणि कवी भागवत संप्रदायाचे प्र्वतक, योगी व तत्वज्ञ होते. ज्ञानेश्वरी, (भावार्थदीपिका) अमृतानुभव, चांगदेव पासष्टी व हरीपाठाचे अंभग ही त्यांची काव्यरचना आहेत. आध्यात्म आणि तत्वज्ञानाविषयक विचार मराठीतूनही व्यक्त करता येतात असा विश्वास त्यांनी आपल्या ग्रंथकर्तृत्वातून निर्माण केला. त्यामुळे समाजातील सर्व थरातील लोकांना आध्यात्मिक लोकशाहीची प्रेरणा मिळाली

माझा मराठाचि बोलू कौतूके । परि अमृतातेही पैजासी जिंके
ऐसी अक्षरे रसिके । मेळवीन

असे म्हणत त्यांनी मराठी भाषेविषयीचा अभिमान, मराठीची महती व्यक्त केली आहे कर्मयोग व भक्तियोग सांगणा—या ज्ञानेश्वरीत 9000 ओव्या आहेत.

''जो जे वांछील तो ते लाहो''

असे म्हणत अखिल विश्वाची जणू काळजी वाहणा—या संत ज्ञानेश्वरांना वारकरी संप्रदायासह सर्वच भक्त प्रमाणे माउली म्हणतात. त्यांनी धर्मातील क्लिष्ट अवडंबरे काढून

धर्माला कर्तव्याचा वेगळा अर्थ दिला आहे वाङ्मय निर्मितीबरोबरच त्यांना आध्यात्मिक लोकशाहीचे बीज रोवण्याचा यशस्वी प्रयत्न चंद्रभागेच्या वाळवंटात केला आहे.

### ❖ संत सावता माळी :- इ.स.1250 ते 1295

संत सावता माळी हे संत ज्ञानेश्वराच्या प्रभावळीचे जेष्ठ संत होते साव म्हणजे खरे तर शुध्द चारित्र्य, सावता महाराज लहानपणासून विठ्ठलभक्तीमध्ये रममान झाले. फुले, फळे भाज्या आदी पिके काढण्याचा त्यांचा पारंपरिक व्यवसाय होता.

आमची माळियाची जात. शेत लावू बागाईत

ही त्यांची परंपरा आहे ऐहिक जीवनात कर्तव्यकर्म करीत असतांनाच काया – वाचे, मणे ईश्वरभक्ती करता येते हा अधिकार सर्वांना आहे.

न लगे सायास न पडे, । संकट नामे सोपीवाट वैकुंठाची

असा त्यांचा रोकडा अनुभव होता. त्यांनी जनसामान्यांना आत्मोन्नतीचा मार्ग दाखविला. त्यांना केवळ 45 वर्षाचे आयुष्य लाभले. धार्मिक प्रबोधनाचे व भक्तिप्रसाराचे कार्य त्यांनी निष्ठेने व्रत म्हणून आचरिले. त्यांचे काही अंभग उपलब्ध आहेत.

कांदा मुळा भाजी । अवघे विठाई माझी

हा एकात्मतेचा व समानतेचा संदेश त्यांच्या समग्र वाड्मयातून प्रत्यसाय येतो.

### ❖ संत सेना न्हावी:

मुळचे मध्यप्रदेशातील हिंदी भाषिक न्हावी समाजाचे असून पंढरपुर येथे येवून संत ज्ञानेश्वर व नामदेव यांच्या सहवासातून त्यांनी मराठी साहित्यामध्ये अभंग रचना केली आहे भागवत संप्रदायातील वारकरी भक्तिरसात त्यांनी स्वतःला झोकून दिले.

आम्ही वारीकं वारीकं । करू हजामत बारीक ।।
विवके दर्पण आयना दाउ । अहंकाराची शेंडी पिळू

PUNE RESEARCH TIMES (ISSN 2456-0960)
AN INTERNATIONAL JOURNAL OF CONTEMPORARY STUDIES SPECIAL ISSUE OCT 2018

श्री विठ्ठल आणि वारकरी संप्रदायाने फक्त जातीपातीच्या सीमा मोडल्या नाहीतर प्रांताप्रांताच्याही सीमा ओलांडल्या संत सेना हे त्यांचेच एक उदाहरण आहे.

### ❖ संत जनाबाई : इ.स.1258 ते इ.स.1350

जनाबाई यांचा काळ हा संत नामदेवाच्याच समकालीन आहे नामदेवाची शिष्या जनाबाई असे त्यांच्या संदर्भात म्हटले जाते. महाराष्ट्रातील स्त्रीया जात्यावर दळण दळतांना जनाबाईच्या ओव्या गात असतात. त्यांच्या नावावर 350 अभंग आहेत वात्सल्य, कोमलता, सहनशीलता, त्यागीवृत्ती या स्त्री विषयीच्या भावना हे त्यांच्या अंभगाची वैशिष्टये आहेत. जनाबाई दासीपणाची कामे करत असतांना तिच्या मनाने अभंगातून प्रगती आणि पारमार्थिक उन्नती केली आहे.

शब्दाचे ब्रम्ह लोकिकी हा दिसे दंड जैसे ते फासे मंहदाचे
ज्ञानी तो कोण । विज्ञानी तो कोण
दोहीचा आपण साक्षभूत.
हा विज्ञानाचा विचारही त्यांच्या अभंगातून डोकावताना दिसतो.

### ❖ संत चोखा मेळा :

संत चोखा हे एक संत ज्ञानेश्वराच्या प्रभावळीतील संत होते संत नामदेव हे त्यांचे गुरू होते तत्कालीन सामाजिक विषमतेमुळे चोखोबा होरपळून निघाले ते शुद्र – अतिशुद्र, गावगाडा, समाजजीवन, भौतिक व्यवहार, उच्चनीचता व वर्णव्यवस्था यांच्या विळाख्यात अडकले. चंद्रभागा नदीच्या वाळवंटात आध्यात्मिक लोकशाही संत ज्ञानदेवामुळेच तेराव्या शतकात उदयाला आली म्हणून ते म्हणतात.

खटनट यावे शुध्द होउनी जावे । दवंडी पिटीभावे डोळा ।

असा पुकारा करून त्यांनी वारकरी संप्रदायातील अध्यात्मिकनिष्ठ अभेद भक्तीचे लोन आपल्या उपेक्षित बांधवापर्यंत नेवून पोहोचविले. आत्मविकासाची संधी तत्कालीन समाजरचनेतील अगदी तळागळातील लोकांनाही मिळावी असे ज्ञानेश्वराही सर्वच संताना प्राजळपणे वाटत होते. त्याच वेळी संत चोखोबानीही भक्तिमार्गाचा संदेश आपल्या अंभगातून समाज बांधवाना दिला.

जोहार मायबाप जोहार । तुमच्या महाराचा मी महार
बहु भुकेला जाहले तुमच्या उष्टयासाठी आलो.

असे त्याचे अंभग आजही जनमानसामध्ये खुप लोकप्रिय आहे.

## ❖ निष्कर्श

1) महाराष्ट्राच्या सांस्कृतिक इतिहासात विविध धर्म आणि धर्मसंप्रदाय याचं अत्यंत महत्वाच स्थान आहे. वारकरी संप्रदायाचा उगम पौराणिक काळातील पुंडलिकापासून झाला असला तरी तेराव्या शतकात ज्ञानदेव – नामदेव या संत द्वयामुळे वारकरी संप्रदायाच्या तत्वज्ञानात आणि आचार धर्मात लक्षणीय परिवर्तन झाले.

2) चातुर्वण्य व्यवस्थेमुळे समाजात उच्चवर्णीय आणि अन्यवर्णीय अशी विषमाधिष्ठित व आध्यात्ममुलक त्याच प्रमाणे समाज दुभंगणारी झाली होती. अशा या व्यवस्थेमध्ये परिवर्तन करून स्वांतत्र्य, बंधुता व समता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न संतानी केला आहे.

3) स्त्रीवर्गाला व शुद्रातिशुद्र या वर्गाला भक्तीचा मार्ग या व्यवस्थेने नाकारला होता परंतु याच संतांनी आध्यात्माच्या माध्यमातून सर्वांना भक्तीचा मार्ग खुला करून दिला.

म्हणून भारतीय लोकशाही ही स्वातंत्र्यानंतर आपण स्वीकारली परंतु याच लोकशाहीची बिजे अध्यात्मिक लोकशाहीतूनच अंकुरीत झाली व त्याचे सर्व श्रेय हे वारकरी संप्रदायाच्या प्रभावळी कडे जाते. असेच म्हणावे लागते.

## संदर्भग्रंथ

❖ मध्ययुगीन मराठी वाड्मयाचा इतिहास.
❖ वारकरी संप्रदायाची आध्यात्मिक लोकशाही
– डॉ.यु.म.पठाण
❖ संतानी आध्यात्मिक लोकशाही निर्माण केली
– डॉ.तारा भवाळकर
❖ अध्यात्म म्हणजे काय.